55


Government Of Maharashtra

महाराष्ट्र शासन

Office of the Joint Director of Industries, Mumbai Metropolitan Region, Mumbai
उद्योग सह संचालक, मुंबई प्राधिकरण विभाग, मुंबई यांचे कार्यालय,

Vikas Centre, 702, 7th Floor, Dr. C.G.Marg, Near Basant Cinema, Chembur (East), Mumbai. 400074.

विकास सेटर, ७०२, ७ वा मजला, डॉ. सी.जी.मार्ग, बसंत सिनेमागृहाजवळ, चेंबूर (पूर्व), मुंबई. ४०००७४.

Tel.No. 25206199/25208182 Email : didicmumbai@gmail.com


दिनांक १२/०४/२०२४

## मुंबई शहर निर्यात प्रचालन कार्यबल समितीची बैठक दिनांक ०६.०३.२०२४ चे इतिवृत्त.

मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा निर्यात प्रचालन समिती गठित करण्याबाबत, शासन उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग यांचे शासन निर्णय क्र. निप्रप-२०२०/प्र.क्र. २८/उद्योग-७, दि. १९.१०.२०२० मध्ये निर्देश देण्यात आल्यानुसार मुंबई शहराकरीता निर्यात प्रचालन समितीची स्थापना करण्याबाबत मा. जिल्हाधिकारी यांची मान्यता घेऊन तसे समिती सदस्य यांना कळविण्यात आल आहे. राज्यातील निर्यातीला चालना देण्याच्या दृष्टीने व निर्यातदारांना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्याकरीता तसेच जिल्ह्यातील निर्यातवाढीसाठी विविध केंद्र व जिल्हा कार्यालये, औद्योगिक संघटना, निर्यात परिषदा, निर्यात सल्लागार इ. यांच्याशी सातत्याने पाठपुरावा समन्वय व अडीअडचणी दूर करण्याच्या दृष्टीने जिल्हा निर्यात प्रचालन समिती परिषदेस सहाय्य करण्यासाठी एक जिल्हा एक उत्पादन आणि निर्यात प्रोत्साहनाकरीता मुंबई शहर निर्यात प्रचालन कार्यबल समितीची बैठक मा. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०६.०३.२०२४ रोजी दुपारी १२:४५ वाजता मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे कार्यालय, जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई- ४०००१ येथे संपन्न झाली.

सर्व प्रथम सदस्य सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती उद्योग उपसंचालक, मुंबई प्राधिकरण विभाग, यांनी बैठकीस उपस्थितांचे स्वागत करून निर्यात प्रचालन समिती संदर्भात मुंबई शहर जिल्ह्याकरीता स्थापन करण्यात आलेल्या निर्यात प्रचालन समिती अंतर्गत करण्यात येणाऱ्या कार्यवाहीबाबत तसेच मुंबई शहराकरीता एक जिल्हा एक उत्पादन प्रकरणी निर्यात प्रोत्साहनाकरीता तसेच निर्यात वाढीकरीता उपक्रम राबविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच मागील इतिवृत्तात नमुद केल्याप्रमाणे मा. विकास आयुक्त (उद्योग) यांनी मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांना अग्रेषित केलेल्या अर्धशासकीय पत्रात नमुद मुद्यांबाबत कार्यवाहीचा अहवाल (Compliance Report) मा. अध्यक्ष यांना सादर केला. बैठकीसाठी उपस्थित प्रतिनिधी यांनी विषयासंदर्भात खालील प्रमाणे मुद्दे उपस्थित केले.

57

| अ.क्र | प्रतिनिधी | उपस्थित केलेले मुद्दे | मा.अध्यक्षांनी दिलेले निर्देश. |
|---|---|---|---|
| १. | उद्योग उप संचालक आणि Ernst & Young प्रकल्प सल्लागार | • Gems & Jewelry क्षेत्रातील झालेल्या घसरणीबद्दल चर्चा झाली.<br>• तसेच निर्यात प्रोत्साहनाकरीता मा.विकास आयुक्त (उद्योग) यांचे अर्धशासकिय पत्रानुसार १० Point Program/ Agenda आणि Achievements बाबत Presentation सादर करण्यात आले. | • मा.अध्यक्ष महोदयांनी Gems & Jewellery क्षेत्रातील झालेल्या घसरणीबाबतच्या कारणांबाबत विचारणा केली. |
| २. | Gems & Jewelry Export Promotion Council | • घसरणीचे सर्वात मोठे कारण जागतिक राजकारण आहे. सद्या सुरु असलेल्या युध्दाचा त्यास सर्वाधिक फटका बसला आहे. कारण बहुतांश कच्चे हिरे हा रशिया या देशाकडून प्राप्त होतो. | • सर्व निर्यात प्रचालन समितीने संभाव्य निर्यातदारांसाठी लवकरात लवकर कार्यशाळा आयोजित करावी. तसेच बँकेत कार्यशाळेबद्दल स्टॉल लावावा. |
| २. | Gems & Jewelry Export Promotion Council | • सिप्झ क्षेत्रामध्ये निर्यातदारांसाठी कॉमन फॅसिलिटी सेंटरची उभारणी करण्यात येणार आहे. तसेच सर्वात मोठे ज्वेलरी पार्क देखील प्रस्तावित आहे. | • सदर सुविधा संभाव्य निर्यातदारांसाठी कशा परिणामकारक होतील याची माहिती निर्यात प्रचालन समिती (जेम्स ॲण्ड ज्वेलरी) यांनी सादर करावी. |

सभेअंती सर्व उपस्थित सभासदांचे आभार मानून मा. अध्यक्ष यांचे परवानगीने बैठक संपन्न झाल्याचे जाहिर करण्यात आले.

उद्योग उप संचालक (मुं.प्रा.वि.) तथा सदस्य सचिव
जिल्हा निर्यात प्रचालन समिती.

मा.उपजिल्हाधिकारी, मुंबई शहर (करमणूक कर)

उपस्थित सभासदांची यादी खालील प्रमाणे:-

१. मा. उपजिल्हाधिकारी, मुंबई शहर (करमणूक कर), मुंबई.
२. सहसंचालक, विदेश व्यापार निदेशालय, सी.जी.ओ. बिल्डींग, मुंबई.
३. उद्योग उप संचालक (मुंप्रावि), जिल्हा निर्यात प्रचालन समिती, मुंबई शहर, मुंबई.
४. मा. जिल्हा अग्रणी व्यवस्थापक, बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया बिल्डींग, १ला मजला, ७०- ८०, एम.जी.रोड, फोर्ट, मुंबई- ४०००१.
५. संचालक, सागरी उत्पादन निर्यातक (MPEDA), योगक्षेम, प्लॉट क्र. ६०५, रिजेन्ट चेंबर्स, ६वा मजला, जमनालाल बजाज रोड, नरीमन पॉईन्ट, मुंबई- ४०००२१.
६. संचालक, जेम्स ॲन्ड ज्वेलरी एक्सपोर्ट कौन्सील, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१.
७. भारतीय निर्यात संस्था फेडरेशन (एफआयइओ), टाईम्स स्क्वेअर, ४था मजला, अंधेरी (पूर्व), मुंबई-५९.
८. सदस्य, कांदिवली को.ऑप.इंडस्ट्रीयल इस्टेट, चारकोप, कांदिवली (प.), मुंबई.